**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १७/१०/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## पोस्टे पारशिवनीहद्दीतील मौजा साहोली येथील घटनेबाबत

महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार लोकांना घर बांधकामासाठी गैरसोय होवु नये साठी वेगवेगळया ठिकाणी वाळु डिपो तयार करण्यात आले आहे. पो.स्टे.पारशिवनी हद्दीतील मौजा साहोली (अ) वाळु डिपो हा सन २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५ या कालमार्यादेसाठी कंत्राटी पद्धतीने " **मे.नमस्वी ट्रेडर्स सावनेर** " यांना देण्यात आला आहे. परंतु काही कारणास्तव सदरचा वाळु डेपो मौजा साहोली येथुन मौजा गरांडा शिवारात हलविण्यात आला. दिनांक. दिनांक ०८/०६/२०२४ चे पुर्वी सदर ठिकाणी साहोली, गरांडा व वाघोडा घाटातुन रेती उपसाकरुन स्टॉक करण्यात आला. नागरिकांनी वाळु विकत घेण्यासाठी ऑन लाईन बुकिंग केल्यानंतर सदर स्टॉक मधुन दिनांक. ०९/१०/२०२४ पासुन रेती देणे सुरु केले. सदर रेती भरलेले ट्रक हे वाघोडा ते डोरली ते सिंगोरी पर्यंत येवुन नंतर पारशिवनीकडे किंवा खापरखेडा कडे जातात. मात्र सदरचे ट्रक हे डोरली गावातील आतील अरुंद रस्त्याने जात असल्यामुळे गावातील नागरिकांना त्रास होवु लागला व सदरचे रेतीने भरलेले ट्रक हे गावातुन जात असल्यामुळे गावातील कमी क्षमतेचे रोड खराब होवुन नये यासाठी गावातील सरपंच प्रकाश दौलतराव अंजनकर व त्यांचे सहकारी लोकांनी सदरचे ट्रक गावातुन जाऊ न देण्याचे आवाहन केले, यादरम्यान दिनांक. १६/१०/२०२४ रोजी सदरचे ट्रक हे गावातील रंजीत नामदेव गजभिये यांचे घरासमोरील रोडने मुरुमाने व रेतीने भरलेले ट्रक गावात कसे आले? असे म्हणुन ट्रक चालकांना इथुन पुन्हा यायचे नाही, असे सांगुन ट्रक सोडुन दिले याच कारणावरुन गावातील सरपंच प्रकाश दोलतराव आंजनकर व रंजीत गजभिये यांचे आपसात झगडा भांडन झाला व दोन्ही पक्ष एकमेकांचे विरोधात रिपोर्ट द्यायला आले, परंतु दोन्ही पक्ष एकच गावातील राहणारे असल्याने व दोघांना एकमेकांचे विरोधात पोलीस कार्यवाही करायची नाही, असे समझौता नामा लिहुन दिल्याने दोन्ही पृक्षावर कोणतीही कार्यवाहीझाली नाही.**मा. श्री. रमेश बरकते , उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देवुन सदर प्रकरणात सखोल चौकशी केली असता मौजा साहोली येथुन मौजा गरांडा शिवारात हलविण्यात अलेला वाळु डेपो चा शासकीय परवाना असल्याचे माहीती प्राप्त झाली. सदरचा वाद हा गावातुन जड वाहतुकी बाबत असल्याने त्या बाबत तोडगा तसेच पर्यायी मार्ग काढण्यासाठी मा.उपविभागिय अधिकारी तसेच तहसीलदार यांचे सोबत चर्चा करण्यात येणार आहे.**

तरीही दोन्ही पक्षामध्ये पुन्हा वाद होवु नये यासाठी दोन्ही पक्षांतील सदस्यांना कलम १६८ भा.ना.सु.सं.अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

## पोस्टे देवलापार येथील अपराध क्र. ११८/१९८१ कलम ३७६ भादवि गुन्हयातील अटक आरोपी नामे मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मिनिराम कारू ठाकरे हा एकच व्यक्ती

पोस्टे देवलापार येथील अपराध क्र. ११८/१९८१ कलम ३७६ भादवि गुन्हयातील आरोपी नामे: मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मिनिराम कारू ठाकरे यास तत्कालीन तपासी अधिकारी यांनी गुन्हयात दि.१८/१०/१९८१ रोजी अटक करून मा.कोर्टात पेश केले होते त्यावेळी मा.कोर्टानी त्यास न्यायालयील कोठडी दिली होती. त्यांनतर आरोपी हा जामिनावर बाहेर आला व मा. कोर्टात हजर न झाल्याने त्याचा मा.रामटेक कोर्टानी बिगर जमानती वारंट काढल्याने पोलीसांकडुन सदर आरोपी याचा शोध घेवुन गुन्हयातील आरोपी नामे: मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मनिराम कारू ठाकरे हा एकच आहे किंवा कसे याबाबत न्यु–तोतलाडोह व आजुबाजूच्या गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, प्रौढ नागरीक यांचे कडे सखोल चौकशी व विचारपुस करून तो एकच असल्याचे व त्याचे वर वरील प्रमाणे जुना गुन्हा असल्याचे गोपनीय माहीतीचे आधारे निष्पन्न झाल्याने सदर आरोपी मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मनिराम कारू ठाकरे वय ६१ वर्षे,रा: न्यु–तोतलाडोह रयतवाडी यास मा.कोर्टाचे प्राप्त बिगर जमानती वारंट (छठॅ) वरून दि.०६/०९/२४ रोजी अटक करून मा.न्याय दंडाधिकारी कोर्ट रामटेक येथे पेश करून मा.कोर्टानी मध्यवर्ती कारागृह येथे रवाना केले होते. **पोलीस स्टेशन देवलपार ठाणेदार यांनी सखोल चौकशी केली असता मानिराम काशिराम ठाकरे उर्फ मिनिराम कारू ठाकरे ही व्यक्ती एकच असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर